प्रेस नोट दि.१९/१०/२०२३

शहापूर पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामिण जि.ठाणे येथील पोलीस हवालदार/३१५९/संतोष अर्जुन मोरे, वय ४५ वर्षे, यांना अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने लाच स्विकारतांना ताब्यात घेतलेबाबत.

| | | |
|---|---|---|
| अँन्टी करप्शन ब्युरो/घटक | :- | ठाणे |
| गुन्हा नोंद कमांक | :- | शहापूर पो.स्टे.,ठाणे ग्रामिण, जि.ठाणे |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :- | लोकसेवक श्री.संतोष अर्जुन मोरे, पोलीस हवालदार/३१५९ नेमणुक शहापुर पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामिण जि.ठाणे |
| मागितलेली लाचेची रक्कम | :- | ४०,०००/-रू. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :- | ३०,०००/-रू. |
| थोडक्यात हकीगत | :- | यातील तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात दिनांक १७/१०/२०२३ रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, तक्रारदार यांचेवर शहापूर पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये त्यांना मदत करण्याकरीता लोकसेवक श्री.संतोष अर्जुन मोरे, वय:- ४५ वर्षे, पोलीस हवालदार/३१५९, नेमणुक शहापुर पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामिण (वर्ग:-३) यांनी तक्रारदार यांचेकडे ४०,०००/-रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती ३०,०००/-रू. लाचेच्या रक्कमेचा स्विकार करणार असल्याचे, दिनांक १७/१०/२०२३ रोजी केलेल्या पडताळणी कारवाईत निष्पन्न झाले.<br>त्याअनुषंगाने दिनांक १९/१०/२०२३ रोजी केलेल्या सापळा कारवाईमध्ये लोकसेवक श्री.संतोष अर्जुन मोरे यांना शहापूर पोलीस स्टेशनचे आवारात ११.२३ वा.लाचेची रक्कम रु.३०,०००/- स्विकारली असताना रंगेहाथ पकडण्यात आले असून, त्यांच्याविरूध्द पुढील कायदेशीर कारवाई शहापूर पोलीस स्टेशन येथे करण्यात येत आहे. |
| | | |

**मार्गदर्शन अधिकारी—मा.श्री.सुनिल लोखंडे सो, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

१) संपर्क पत्ता :- लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेत स्थळ :- acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई-मेल आयडी :- spacbthane@mahapolice.gov.in
४) अॅप्लीकेशन :- acbmaharashtra.net
५) टोलफ्री क्र. :- १०६४
६) दुरध्वनी क्रमांक :- ०२२-२०८१३५९९

(नितीन थोरात)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे